# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-**
**{प्रकल्प -3 विभाग}**

नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत मौजा नागपूर येथील मनपाच्या जागेवर महाल परिसरात जुने टाऊन हॉल व क्षेत्रीय कार्यालयाची जिर्ण इमारत तोडून नविन श्रीमंत राजे रघोजीराव भोसले टॉऊन हॉलचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई - निविदेतील Tender ID No. 2024_NMCN_1001038_1 प्राप्त एकुण दोन निविदांपैकी में. प्रफुल्ल वेद इन्फ्रा प्रा. लि. नागपूर यांची 3.99 % कमी दराची निम्नतम रु. 89.111 कोटी रक्कमेची निविदा मंजुरी प्रदान करुन मे. प्रफुल्ल वेद इन्फ्रा प्रा. लि. नागपूर यांना रु. 107.175 कोटी (including GST + LWC + Royalty + Testing Charges) रक्कमेचा राशीचे कार्यादेश निर्गमित करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टिप:-

1. प्रस्तूत कामास सक्षम प्राधिकरणाची स्थापत्य कामाची तांत्रीक मान्यता क्रं. CE/PWD/TS/284/ 2023 – 24 दि. 23/01/2024 व विद्यूत विभागाची तांत्रिक मान्यता SE/PWD/TS/506/23-24 दि. 05/02/2024 अन्वये प्राप्त आहे.
2. सदर कामास प्रशासकीय मान्यता क्रं.जिपकाना/मुलभुत प्र.मा./का.वि./231/2024 दि.30/01/2024 अन्वये.
3. सदर कामाचा खर्च पद क्रं. 42170541 मुलभुत सोई सुविधा विशेष तरतुद योजने अंतर्गत करण्यात येईल.
4. उपरोक्त कामाकरिता मे. क्रीएशन प्रा. लि. पूणे व सम्यक (J.V.) यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.
5. उपरोक्त कामासाठी Performance Security व स्टॅम्प डयुटी सादर करण्याबाबत पत्र देण्यात आले त्या अनुषंगाने कंत्राटदाराने Performance Security व स्टॅम्प डयुटी सादर केली आहे.
6. विस्तृत टिप्पणी नस्तीत संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 839/**स्थायी समिती/प्रशासक** **दिनांक :-** 15/03/2024

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प - 3 विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिका, नागपूर अंतर्गत मौजा नागपूर येथील मनपाच्या जागेवर महाल परिसरात जुने टाऊन हॉल व क्षेत्रीय कार्यालयाची जिर्ण इमारत तोडून नविन श्रीमंत राजे रघोजीराव भोसले टॉऊन हॉलचे बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई - निविदेतील Tender ID No. 2024_NMCN_1001038_1 प्राप्त एकुण दोन निविदांपैकी में. प्रफुल्ल वेद इन्फ्रा प्रा. लि. नागपूर यांची 3.99 % कमी दराची निम्नतम रु. 89.111 कोटी रक्कमेची निविदा मंजुरी प्रदान करुन मे. प्रफुल्ल वेद इन्फ्रा प्रा. लि. नागपूर यांना रु. 107.175 कोटी (including GST + LWC + Royalty + Testing Charges) रक्कमेचा राशीचे कार्यादेश निर्गमित करण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.